## शिक्षण विभाग(प्राथमिक),जिल्हा परिषद,गडचिरोली

# नि:शुल्क आयआयटी/जे.ई.ई.कोचिंग

# प्रवेशपुर्व चाचणीकरीता विद्यार्थ्यांकडुन आवेदन अर्ज मागविणे तसेच पदभरतीकरीता जाहिरात क्रमांक -01/2021,दिनांक:- 03.11.2021

आकांक्षीत जिल्हा कार्यक्रमांअतर्गत गडचिरोली जिल्हयातील विद्यार्थ्यांना **IIT/NIT** मध्ये प्रवेश मिळविण्याकरीता तज्ञ प्रशिक्षकांकडुन आय.आय.टी.-जे.ई.ई. (IIT/JEE) या अभ्यासक्रमांचे **नि:शुल्क विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशाकरीता** प्रवेश पुर्व चाचणी परीक्षा **(Entrance Test)** करीता जिल्हयातील शासकीय, खाजगी तसेच स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयातील **सन 2021-22 या सत्रामध्ये 11 वी विज्ञान शाखेत प्रवेशीत** व इंजिनीअरींग क्षेत्रात जाण्यास ईच्छुक **केवळ गडचिरोली जिल्हयातील मुळचे रहिवासी विद्यार्थ्यांकडुन आवेदन अर्ज संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे स्तरावर मागविण्यात येत आहेत. जि. प. चे संकेतस्थळावर प्रसिध्द सविस्तर जाहिरातीतील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

**आवेदन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक**:- दि. 12.11.2021 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत.

**प्रवेश पुर्व परीक्षेचा दिनांक व वेळ** :- दि. 28.11.2021, स. 11.30 ते 2.30 वाजेपर्यंत

## पदभरतीचे विवरण

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण जागा | पात्रता | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | प्राध्यापक, विषय-भौतिकशास्त्र | 01 | 1.आय आय टी/ एन आय टी/ नामांकित अभियांत्रिकी संस्थानामधून स्नातक /स्नातकोत्तर पदवी.<br>2.भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित विषय शिकवण्याचा किमान 01 वर्षांचा अनुभव | 80000/- प्रतिमाह |
| 2 | प्राध्यापक, विषय -रसायनशास्त्र<br>1. सेंद्रीय रसायनशास्त्र. (Organic)<br>2. असेंद्रीय रसायनशास्त्र. (Inorganic)<br>3. भौतिक रसायनशास्त्र (Physical) | 01 | | |
| 3 | प्राध्यापक, विषय -गणित | 01 | | |
| 4 | गृहपाल महिला-01 व पुरुष-01 | 02 | बी. एसडब्लू/ एम. एसडब्लु, किमान 01 वर्षाचा अनुभव | 12000/- प्रतिमाह |
| 5 | चौकीदार, पुरुष-02 | 02 | 1) होमगार्ड प्रशिक्षण, 2) सुरक्षा विषयक प्रशिक्षण, 3) सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी | 8000/- प्रतिमाह |

**वरील पदांकरीता अर्ज सादर करावयाचा पत्ता**:- शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली, नवेगाव कॉम्प्लेक्स, गडचिरोली-442605. आवेदन अर्ज **eoprygadchiroli@gmail.com** या ई-मेलवर सुध्दा स्विकारल्या जाईल. **प्रकल्पाचे उद्देश, परीक्षेचे स्वरुप, प्रवेश मर्यादा व इतर सविस्तर बाबींसह** जाहिरात **जिल्हा परिषदेच्या** www.zpgadchiroli.org व www.zpgadchiroli.in **या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.**

( हेमलता जे. परसा)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद गडचिरोली

(कुमार आशिर्वाद,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

# शिक्षण विभाग(प्राथमिक),जिल्हा परिषद,गडचिरोली

## जाहिरात

**जाहिरात क्रमांक** :- - -01/2021 दिनांक :- /11/2021

आकांक्षीत जिल्हा कार्यक्रमांअतर्गत व निती आयोग,केंद्र शासन पुरस्कृत/अर्थसहाय्यातुन गडचिरोली जिल्हयातील अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गाचे तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीचे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास त्यांचे राखीव जागेवर इतर प्रवर्गाचे हुशार, होतकरु व जिज्ञासु विद्यार्थ्यांना भारतीय तंत्रज्ञान संस्थेत(IIT/NIT) प्रवेश मिळविण्याकरीता तज्ञ प्रशिक्षकांकडुन आय.आय.टी.- जे.ई.ई.(IIT/JEE) या अभ्यासक्रमांचे विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशाकरीता प्रवेश पुर्व चाचणी परीक्षेकरीता याव्दारे जिल्हयातील शासकीय, खाजगी तसेच स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयातील **सन 2021-22 या सत्रामध्ये 11 वी विज्ञान शाखेत प्रवेशीत** व इंजिनीअरींग क्षेत्रात जाण्यास ईच्छुक **केवळ गडचिरोली जिल्हयातील मुळचे रहिवासी विद्यार्थ्यांकडुन आवेदन अर्ज मागविण्यात येत आहेत.**

1. **प्रकल्पाचे उद्देश** :- देशातील उच्चशिक्षण देणारी व विद्याविभुषीत विद्यार्थी घडविणारी एकमेव संस्था म्हणजे भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT/NIT) आहे. गडचिरोली जिल्हयातील अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गाच्या हुशार,होतकरु जिज्ञासु विद्यार्थ्यांना आयआयटी/एनआयटी (IIT/NIT) या नामांकीत संस्थेतुन शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध व्हावी या हेतुने गडचिरोली जिल्हयातील धानोरा तालुक्यातील मोहली या शहरात जिल्हयातील विद्यार्थ्यांना IIT/NIT या संस्थेत प्रवेश मिळण्याकरीता कोचींग सेंटर सुरु करण्यात येत आहे.

2. **प्रकल्पाचे स्वरुप** :-

- **जिल्हयातील सन 2021-22 या सत्रामध्ये 11 वी विज्ञान शाखेत प्रवेशीत झालेले** एकुण 150 हुशार विद्यार्थ्यांना आय.आय.टी./एन.आय.टी.(IIT/NIT) या संस्थेत प्रवेश मिळविण्याकरीता आवश्यक असलेले सर्व कौशल्य, अभ्यासक्रमांची शिकवण देण्यात येईल.
- याकरीता विद्यार्थ्यांना निवास, भोजन व शिक्षणाकरीता आवश्यक साहित्य नि:शुल्क पुरविण्यात येईल.
- ज्या महाविद्यालयात प्रवेशीत आहेत त्याच महाविद्यालयात त्यांचे नाव प्रवेशीत राहतील परंतु सदर प्रकल्पांतर्गत संस्थेमध्ये निवासी शिक्षण दिल्या जाईल.
- सदर शिक्षण देण्याकरीता आय.आय.टी. या संस्थेतुन उत्तीर्ण झालेले उच्च विद्याविभुषीत तज्ञ शिक्षकांची नियुक्ती करण्यात येतील.
- सदर अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेण्याकरीता पालकांची संपुर्ण लेखी संमती आवश्यक राहील.
- सदर अभ्यासक्रम मॉडेल स्कुल मोहली, ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली या इमारतीमध्ये करण्यात येईल व याच इमारतीचे लगत निवासाची व्यवस्था करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांना निर्मळ वातावरण असलेला, वर्दळ नसलेला,कोणत्याही प्रकारचे बाहयस्थ ध्वनीप्रदुषण नाही असे ठिकाण असावे या करीता सदर संस्थेची व ठिकाणाची निवड करण्यात आलेली आहे.
- **सदर प्रशिक्षणाकरीता केवळ अनुसुचित जाती-जमातीचे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतील.**
- **तुर्तास सर्व प्रवर्गाचे विद्यार्थ्यांना प्रवेश पुर्व परीक्षेकरीता संधी देण्यात येत असुन अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीचे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास त्यांचेकरीता राखीव जागेवर इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार व इतर निकषानुसार प्रवेश देण्यात येतील.**

3. **अर्ज करण्याची पध्दत** :-

| | |
|---|---|
| 1 | प्रस्तुत परीक्षेकरीता संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्यांकडे सादर करावे. संबंधित प्राचार्य प्राप्त अर्ज संकलीत करुन विहीत प्रपत्रातील माहितीसह संबंधित तालुक्याचे **गटशिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात सादर करतील.** |
| 2 | अर्जाचा नमुना सदर जाहिरातीसोबत संलग्न करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| 3 | अर्जासोबत विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र (असल्यास जात वैधता प्रमाणपत्र), अधिवास प्रमाणपत्र(डोमीसाईल सर्टिफीकेट),नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग असल्यास दिव्यांगाचे ऑनलाईन प्रमाणपत्र, पालकांचे हमीपत्र संलग्न असणे व फोटोवर मुख्याद्यापकांचे साक्षांकन असणे अनिवार्य आहे. |

## 4. संपुर्ण प्रक्रियेसंबंधीत ठरवुन दिलेल्या दिनांकनिहाय विवरण :-

| | | |
|---|---|---|
| 1 | परीक्षेचा दिनांक व वेळ | दि. 28.11.2021, स. 11.30 ते 2.30 वाजेपर्यंत |
| 2 | आवेदन अर्ज महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेकडे सादर करण्याची अंतिम दिनांक | दिनांक 12.11.2021 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत |
| 3 | प्राचार्य यांनी संबंधित गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करण्याची अंतिम दिनांक | दिनांक 14.11.2021 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत |
| 4 | गटशिक्षणाधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांचेकडे सादर करावयाचा अंतिम दिनांक | दिनांक 16.11.2021 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत |
| 5 | पात्र/अपात्र विद्यार्थ्यांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे | दिनांक 18.11.2021 रोजी दु. 3.00 वाजता |
| 6 | पात्र/अपात्र यादीवर आक्षेप स्विकारणे | दि. 19.11.2021 रोजी संध्या. 5.00 वाजेपर्यंत |
| 7 | अंतिम पात्र यादी प्रसिध्द करणे | दि. 19.11.2021 रोजी संध्या. 6.15 वाजता |
| 8 | परीक्षेचे प्रवेशपत्र गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षणाधिकारी(प्रा.), यांचेकडुन स्विकारणे | दिनांक 20.11.2021 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत |
| 9 | परीक्षेचे प्रवेशपत्र प्राचार्य यांनी गटशिक्षणाधिकारी यांचेकडुन स्विकारणे | दिनांक 21.11.2021 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत |
| 10 | प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र तामील करणे | दिनांक 22.11.2021 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत |
| 11 | नमुना उत्तरतालिका प्रसिध्दीचा दिनांक | दि. 28.11.2021 रोजी संध्या. 5.00 वाजता |
| 12 | गुणवत्ता यादी प्रसिध्दीचा दिनांक | दि. 30.11.2021 रोजी संध्या. 5.00 वाजता |
| 14 | प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांचे मुळ दस्ताऐवज तपासणीचा दिनांक | दिनांक 01.12.2021 रोजी सकाळी 9.45 वाजता |
| 15 | प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्दीचा दिनांक | दि. 01.12.2021 रोजी संध्या. 5.00 वाजता |
| 16 | प्रत्यक्षात प्रशिक्षण सत्र सुरु होण्याचा दिनांक | दिनांक 05 डिसेंबर 2021 पासुन नियमित. |

## 5. वरील सर्व पदांबाबत परीक्षेचे स्वरुप,दर्जा व परीक्षा केंद्र :-

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रश्नांचे माध्यम | इंग्रजी व मराठी |
| 2 | प्रश्नाचा दर्जा | इयत्ता 10 वी मधील अभ्यासक्रमातील विषयानुसार |
| 3 | प्रश्नांचे स्वरुप | गणित-25 प्रश्न<br>विज्ञान-1 -25 प्रश्न (भौतीकशास्त्र)<br>विज्ञान-2 -25 प्रश्न(रसायनशास्त्र) |
| 4 | प्रति प्रश्न गुण | 03 गुण प्रति प्रश्न, एकुण प्रश्न -75, एकुण गुण- 225 |
| 5 | नकारात्मक गुणांकन पध्दत<br>**(Negative Marking System)** | प्रत्येक चुकीच्या प्रश्नामागे 01 गुण वजा होईल. |
| 6 | परीक्षा केंद्र | प्रत्येक तालुक्यात परीक्षेचे केंद्र राहतील. |
| 7 | उत्तरपत्रिका तपासण्याची कार्यपध्दती | उत्तरपत्रिका ओ.एम.आर. मशीनव्दारे तपासण्यात येतील. |

6. प्रवेशपुर्व चाचणी परीक्षेसबंधी सविस्तर जाहिरात **www.zpgadchiroli.org** व **www.zpgadchiroli.in** या संकेतस्थळावर,जिल्हा परिषदेच्या सुचना फलकावर,जिल्हयातील सर्व पंचायत समितीचे सुचना फलकावर उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी जाहीरातीतील नमुद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचुन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेकडे अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला चाचणी परीक्षेदरम्यान दरम्यान वेळोवेळी भेट देवून प्रक्रीयेसंबधी आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

7. प्रवेश पुर्व चाचणी परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती चे विद्यार्थ्यांचे प्रवेशाचे मर्यादेमध्ये वाढ किंवा घट करणे,चाचणी परीक्षेमध्ये उच्च गुणवत्ता प्राप्त इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांस प्रवेश देणे, तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीचे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे संपुर्ण अधिकार तसेच भरती प्रक्रीया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांना असतील. सदर प्रकियेत कोणत्याही प्रकारचा बाहयस्थ दबाव स्विकाराहे राहणार नाही. कारण सदर प्रशिक्षणाकरीता उच्च गुणवत्ता प्राप्त अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीचे विद्यार्थ्यांमधुन व सदर विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास शिल्लक पदांवर इतर प्रवर्गाचे विद्यार्थ्यांमधुन निवड होणार आहे.

8. **प्रवेश पुर्व परीक्षेव्दारे निवडीची कार्यपध्दती:- प्रवेश पुर्व चाचणी परीक्षेमध्ये प्राप्त गुणांनुसार गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येऊन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.**

9. **समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती**

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं 1216 /प्र.क्र.-65 /16 /13- अ दिनांक 13 जुन 2018 अन्वये परीक्षेचा निकाल तयार करतांना परीक्षेत ज्या पात्र विद्यार्थ्यांना समान गुण असतील अशा विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| अ) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| ब) वयाने जेष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांस प्राधान्य देण्यात येईल. |
| ड) वरीलप्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास इयत्ता 10 वी मध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

10. **सर्वसाधारण सुचना**

| **सर्वसाधारण अटी व शर्ती** | **शेरा** |
|---|---|
| अ) उमेदवार भारतांचा नागरीक असावा. | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| क) विद्यार्थी हा गडचिरोली जिल्हयातील रहिवासी असावा. | |

| **11) महत्वाच्या सुचना** | |
|---|---|
| 1) | 1)उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>2) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी सुध्दा) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>3) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी सध्याचे वैध फोटो ओळखपत्र पुरावा म्हणुन सोबत ठेवणे आवश्यक आहे.<br>(1) पॅनकार्ड, (2) पासपोर्ट, (3) वाहन अनुज्ञप्ती (4) मतदार ओळखपत्र (5) फोटोसह राष्ट्रीयकृत बँक पासबुक (6) मूळ आधारकार्ड 7) शाळा/महाविद्यालयाचे ओळखपत्र |

| | |
|---|---|
| 3) | उमेदवारांना लेखी/व्यावसायिक परिक्षेस तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| 4) | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| 6) | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा निवडीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती खोटी असल्याची अथवा बनावट कागदपत्रे सादर केल्याचे अथवा विद्यार्थ्याने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे अथवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड रद्द ठरविण्यात येईल. |
| 7) | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही कारणामुळे विहित दिवशी परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परीक्षा घेतली जाईल. |
| 8) | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे म्हणता येणार नाही. |
| 9) | उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या प्रशिक्षण प्रवेशाकरीता मुलाखती नसल्याने प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. |
| 11 | **अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास अथवा प्रकल्पासंबंधानेकोणत्याही माहितीची आवश्यकता भासल्यास त्यासाठी** 1) श्री. शैलेश ढेके परिवह स. मो.न. 7304884051 (2) श्री. देवानंद समर्थ, डाटा एन्ट्री ऑफिसर मो.न. 9404125010 **या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.** |

**(12) इतर सर्वसाधारण सूचना**

**(14) परीक्षेस प्रवेश**

1) पात्रता परीक्षा व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल.
2) फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहीत्यासह उमेदवाराला परिक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.
3) डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंर्तभुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्ल्यु-टुथ, दुरसंचार साधने म्हणुन वापरण्या योग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोट्स, परावानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहीत्य परिक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परिक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परिक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
4) परवानगी नाकारलेल्या कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत साधन/साहित्य परिक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन /साहीत्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद प्रशासन किंवा परिक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**( हेमलता जे. परसा)**
**शिक्षणाधिकारी(प्राथमिक)**
**जिल्हा परिषद गडचिरोली**

(कुमार आशिर्वाद,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

# शिक्षण विभाग(प्राथमिक),जिल्हा परिषद,गडचिरोली

## जाहिरात

**जाहिरात क्रमांक :- - 01 /2021 दिनांक :- 03/11/2021**

आकांक्षीत जिल्हा कार्यक्रमाच्या माध्यमातून व निती आयोगाच्या सहाय्याने शिक्षण विभाग, प्राथमिक, जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत मॉडेल स्कूल, मोहली, तालुका- धानोरा येथे सुरु करण्यात येत असलेल्या **आयआयटी-जेईई (IIT-JEE) कोचिंग सेंटर करीता** खालील पदावर मानधन तत्वावर नियुक्तीकरीता **दिनांक - 18 /11/2021 पर्यंत कार्यालयीन वेळेत** आवेदन अर्ज खाली नमुद पत्यावर मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण जागा | पात्रता | एकत्रित वेतन | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **प्राध्यापक, विषय-भौतिकशास्त्र** | 01 | 1.आय आय टी/ एन आय टी / नामांकित अभियांत्रिकी संस्थानामधून स्नातक/ स्नातकोत्तर पदवी.<br>2.भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित विषय शिकवण्याचा किमान 01 वर्षांचा अनुभव | 80000/- प्रतिमाह | अनारक्षित पदासाठी (खुला प्रवर्ग) **कमाल 38 वर्षे** व राखीव पदाकरीता (मागास वर्गीय प्रवर्ग ) **कमाल 43 वर्षे** |
| 2 | **प्राध्यापक, विषय -रसायनशास्त्र**<br>1. सेंद्रीय रसायनशास्त्र. (Organic)<br>2. असेंद्रीय रसायनशास्त्र. (Inorganic)<br>3. भौतिक रसायनशास्त्र (Physical) | 01 | | | |
| 3 | **प्राध्यापक, विषय-गणित** | 01 | | | |
| 4 | गृहपाल महिला-01 व पुरुष-01 | 02 | बी. एसडब्लू/ एम. एसडब्लु, किमान 01 वर्षांचा अनुभव | 12000/- प्रतिमाह | |
| 5 | चौकीदार, पुरुष-02 | 02 | 1. होमगार्ड प्रशिक्षण,<br>2. सुरक्षा विषयक प्रशिक्षण<br>3.सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी<br>4. **National Certificate for Vocational Training/ Sector Skill council/ National Skill Development council** हे सुरक्षा विषयक प्रमाणपत्र असणाऱ्यांना प्राधान्य | 8000/- प्रतिमाह | |

**<u>अटी व शर्ती</u>** :-

1. नोकरीचे स्वरूप निवासी असुन ऑफलाईनरित्या वर्ग घेण्यात येईल.
2. अर्जदार किमान १ वर्ष काम करण्यास तयार असणे आवश्यक आहे.
3. राजिनामा द्यावयाचे असल्यास दोन महिन्याचे मानधन शासन खाती जमा करावे लागेल.
4. अर्जदाराने राहण्याची व जेवणाची व्यवस्था स्वत: करावी लागेल, यामध्ये प्रशासनाकडुन आवश्यक ती मदत करण्यात येईल परंतु तरीही संपुर्ण जबाबदारी ही उमेदवारांची राहील.
5. सरळसेवा भरतीकरीता विहीत शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता पुर्ण करणे अनिवार्य राहील.
6. नियुक्तीपुर्व तसेच नियुक्तीनंतर शासनाकडुन प्राप्त होणारे निर्देश उमेदवारांस बंधनकारक राहील.

**<u>अर्ज सादर करावयाचा पत्ता</u>**:- शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली, नवेगाव कॉम्प्लेक्स, गडचिरोली-442605. आवेदन अर्ज eoprygadchiroli@gmail.com या ई-मेलवर सुध्दा स्विकारल्या जाईल. सविस्तर जाहिरात व आवेदन अर्जाचा नमुना जिल्हा परिषद गडचिरोलीचे **www.zpgadchiroli.in** www.zpgadchiroli.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

## अर्जदारासाठी सुचना :-

1. वरील पदांकरीता अर्ज विहीत नमुन्यातच करावा.
2. चुकीचे अर्ज व विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
3. अर्जासोबत शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, जन्मतारखेचा पुरावा (T.C.), जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडणे अनिवार्य राहील.
4. एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यास उमेदवाराने प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.
5. जाहिरातीत नमूद सर्व पदांसाठी उमेदवारांचे वय जाहीरात प्रकाशित झालेल्या दिवशी 18 वर्षापेक्षा कमी नसावे. तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे कमाल वय 38 वर्षे व मागास वर्गीय उमेदवारासाठी 43 वर्षापेक्षा जास्त नसावे.
6. अर्जावर नुकतेच काढलेले छायाचित्र लावावे, त्यावर स्वत: स्वाक्षरी करावी. अर्जातील संपूर्ण माहिती भरणे अनिवार्य राहील. अर्जाचा नमुना **जिल्हा परिषद गडचिरोली http://www.zpgadchiroli.org व www.zpgadchiroli.in या वेबसाईटवर उपलब्ध राहील.**
7. उमेदवारांची मुलाखतपत्र, गुणवत्ता व निवड यादी तसेच इतर बाबींच्या अनुषंगाने माहिती **जिल्हा परिषद गडचिरोली चे वरील वेबसाईटवर** वेळोवेळी प्रकाशित करण्यात येईल ती पाहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. याबाबत कोणतीही उजर तक्रार विचारात घेतली जाणार नाही व पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**निवड कार्यपध्दती :-**

1. सदर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका एक वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने करारावर करण्यात येईल.
2. गृहपाल या पदाकरीता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार BSW/ MSW यात प्राप्त केलेल्या गुणांच्या व अनुभवाच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
3. चौकीदार पदासाठी माजी सैनिक/ माजी पोलीस/ सुरक्षा विषयक प्रमाणपत्र तसेच कामाचा अनुभव या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाईल. त्यानंतर प्रत्यक्ष मुलाखत घेऊन निवड करण्यात येईल.
4. प्राप्त अर्जामधून गुणवत्तेच्या आधारे तयार करण्यात आलेली निवड व प्रतिक्षा यादी 1 वर्षाकरीता मर्यादित राहील.
5. उमेदवारांनी सादर केलेले दस्ताऐवज खोटे आढळून आल्यास निवड प्रक्रियेनंतरही नेमणूक रद्द करण्यात येईल व नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.
6. कोणत्याही टप्प्यावर निवड प्रक्रिया थांबवणे किंवा रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी म्हणुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे राहील.
7. वेळोवेळी शासनाने ठरवुन दिलेले निर्देश हे उमेदवारांना नियुक्ती पुर्वी व नियुक्तीनंतर सुध्दा मान्य करणे बंधनकारक राहील.
8. सदर नियुक्ती ही अगदी तात्पुरत्या स्वरुपाची व कंत्राटी स्वरुपाची असल्याने नियमित नियुक्तीकरीता हक्क बजावता येणार नाही.
9. नियुक्ती स्विकारल्यानंतर एक वर्षापर्यंत सेवा देणे बंधनकारक राहील. अन्यथा अल्पावधीमध्ये राजिनामा द्यावयाचे झाल्यास दोन महिन्याचे मानधनाची रक्कम शासन खाती जमा करावे लागेल.

| | |
|---|---|
| **( हेमलता जे. परसा)** | **(कुमार आशिर्वाद,भा.प्र.से.)** |
| **शिक्षणाधिकारी(प्राथमिक)** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| **जिल्हा परिषद गडचिरोली** | **जिल्हा परिषद, गडचिरोली** |

20

# शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली

## आय.आय.टी - जे.ई.ई. चाचणीकरीता आवेदन अर्ज

**शाळेचे नाव :** ------------------------------------------------------------ इयत्ता --------------

1 विद्यार्थ्याचे पुर्ण नाव ----------------------------------------------
(10 वी च्या गुणपत्रिकेप्रमाणे )

2 वडीलाचे नाव ------------------------------

3 आईचे नाव ------------------------------

4 जन्मतारीख ____________________

मुख्याध्यापकव्दारा साक्षांकीत

5 लिंग (पुरुष / स्त्री ) ------------------------------

6. जात प्रवर्ग ( अनु.जाती / अनु.जमाती / इमाव / ई.डब्ल्यू.एस. / सर्व साधारण ) ------------------------------
(जात प्रमाणपत्र, व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडावे )

7. विद्यार्थी अपंग आहे काय ?( होय / नाही ) -------------

8. रहिवासी राज्य ------------------------------
(अधिवास प्रमाणपत्र जोडावे)

9. आधार क्रमांक ____________________

10. मोबाईल क्रमांक व पर्यायी मोबाईल क्रमांक 1) ____________ 2) ____________

11. ई-मेल आयडी ____________________

12. वडीलांचा व्यवसाय ------------------------------

13. 10 वीचा निकाल : एकुण गुण ________ प्राप्त गुण ________ टक्केवारी ________

14. दहावीच्या परिक्षेचे माध्यम ----------------------

15. परिक्षा बोर्ड (राज्य मंडळ / सी.बी.एस.ई. / इतर ) ------------------------------

16. पत्रव्यवहाराचा पत्ता ----------------------------------------------------------------

17. कायमचा पत्ता ----------------------------------------------------------------

दिनांक : ____________

**विद्यार्थ्याची स्वाक्षरी**

### पालकाचे हमीपत्र

हमीपत्र लिहून देतो की, माझा पाल्य ------------------------------------------------ हा / ही ------------------------------------------ या शाळेत इयत्ता 11 वीला शिकत आहे. जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत IIT JEE Coaching Classes सुरु करण्यात येत आहेत. सदर प्रशिक्षण वर्गात माझ्या पाल्याच्या प्रशिक्षणासाठी आणि निवासी राहण्याकरीता माझी काहीही हरकत नाही. मी स्वेच्छेने माझ्या पाल्याला या प्रशिक्षण वर्गात सहभागी करण्याची हमी देत आहे.

**पालकाची सही**

### पोचपावती

------------------------------------------------------------ यांचा अर्ज ____________ तारखेला प्राप्त झाला.

**स्वाक्षरी**

# जिल्हा परिषद गडचिरोली

## शिक्षण विभाग(प्राथमिक)

### आय.आय.टी.-जे.ई.ई. कोचींगमध्ये आवश्यक पदांकरीता आवेदन अर्जाचा नमुना

| अलीकडचे रंगीत पासपोर्ट फोटो |
|---|
| स्वाक्षरी |

1. ज्या पदाकरीता अर्ज केला त्या पदाचे नाव :- ------------------------------------------------------------

2. अर्जदाराचे पुर्ण नाव (मराठी)------------------------------------------------------------------------

   (इंग्रजी)________________________________________

3. मुळचे रहिवासाचे ठिकाण :- --------------------------------------------------------------------------------

4. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पीन कोड,मोबाईल क्रमांक,व्हाट्सअॅप मो.क्र. व ई-मेल सह):- -----------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

5. जात प्रवर्ग :- ------------------------------------- 6. जन्मदिनांक- - / /

6. अर्जाचे दिनांकास वय :- --------------- 7. जन्मठिकाण:- ------------- ता./जि.---------------

7. **शैक्षणीक अर्हता :-**

| अ. क्र. | अर्हतेचे नाव | संस्थेचे नाव | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एस.एस.सी. | | | | | |
| 2 | एच.एस.सी. | | | | | |
| 3 | पदवी | | | | | |
| 4 | पदव्युत्तर पदवी | | | | | |
| 5 | संगणक प्रशिक्षण | | | | | |
| 6 | सुरक्षा विषयक प्रशिक्षण | | | | | |
| 7 | इतर अर्हता | | | | | |

8. **अनुभवाचा तपशील:-**

| अ. क्र. | पद | कार्यालय/ संस्थेचे नाव | कालावधी (पासुन-पर्यंत) | एकुण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

9. उमेदवार खालीलप्रवर्गापैकी असल्यास संबंधित प्रवर्ग नमुद करावा. ( ✓अशी खुण करावी) (केवळ अर्ज केलेल्या पदाकरीता आवश्यक बाबींसमोर अभिप्राय देण्यात यावे.)

1. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी **आहे / नाही**
2. माजी सैनिक **आहे / नाही**
3. भुकंपग्रस्त **आहे / नाही**
4. प्रगल्पग्रस्त **आहे / नाही**
5. पदविधर अंशकालीन **आहे / नाही**
6. दिव्यांग ( असल्यास प्रकार ------------------------------------) **आहे / नाही**
7. राष्ट्रीय/राज्यस्तरीय खेडाळू, प्रकार ---------------------------- **आहे / नाही**
8. विवाहीत, (असल्यास लहान कुटुंब प्रमाणपत्र संलग्न करावे) **आहे / नाही**
9. सेवायोजन/समाजकल्याण/आदिवासी प्रकल्प यांचेकडे नाव नोंदणी. **आहे / नाही**
   असल्यास नोंदणी क्रमांक / दिनांक -------------------------------------------
10. जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केली. **आहे / नाही**
   असल्यास, नोंदणी क्रमांक / दिनांक/ वैधता दिनांक: ---------------------------------------------------

## प्रतिज्ञापन

प्रमाणीत करतो/करते की, मी आपले कार्यालयाकरीता ------------------------------------- चे पद भरण्यासंबंधी जाहिरात काळजीपुर्वक वाचली असुन वरील अर्जात नमुद माहिती खरी असुन सादर केलेले दस्ताऐवज खोटे असल्याचे भविष्यात आढळुन आल्यास माझी संबंधित पदाकरीता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील, याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील व मला तो बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही उलट तक्रार राहणार नाही.

**स्थळ :-**

**दिनांक:-**

**उमेदवाराची स्वाक्षरी**